
सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ५ ऑगस्ट २०२६

आतील पानावर

पान २– रजनीकांत यांचा संघर्ष येणार रुपेरी पडद्यावर?
पान ३ –'धूम ४'मध्ये दिसणार रणबीर कपूर?
पान ४ – ऋषभ शेट्टीच्या चित्रपटात भूमीची वर्णी
पान ५ – 'राका'मधून धुमाकूळ घालणार अल्लू अर्जुन
पान ६ – पूजा अन् वैभव पुन्हा एकत्र!






# श्रीदेवींच्या 'मॉम'चा येतोय सीक्वल

अभिनेत्री श्रीदेवी यांचा २०१७ मध्ये आलेला 'मॉम' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. आता तब्बल ९ वर्षांनंतर या चित्रपटाचा सिक्कल येणार असून, याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. श्रीदेवी यांचं निधन झाल्यानंतर या चित्रपटात प्रमुख भूमिका कोण साकारणार, असा प्रश्न सर्वांच्या मनात होता. अखेर याविषयी खुलासा झाला आहे.

सध्या 'मॉम २'च्या सीक्कलवर काम सुरु असून अभिनेत्री खुशी कपूर आता या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. नोव्हेंबर २०२६ मध्ये चित्रपटगृहांमध्ये 'मॉम २' चित्रपट प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. खुशीचे वडील बोनी कपूर या चित्रपटाची निर्मिती करत असून, याचं शूटिंग नोएडा आणि ग्रीसमध्ये झाले आहे. वृत्तानुसार, 'मॉम २' चं कथानक श्रीदेवी यांच्या भूमिकेशी जोडलेलं असेल.

'मॉम' हा श्रीदेवी यांचा शेवटचा चित्रपट होता; त्यामुळे हा प्रोजेक्ट खुशी कपूरसाठी अत्यंत भावनिक आणि खास मानला जात आहे, कारण ती आपल्या आईच्या या आयकॉनिक चित्रपटाचा वारसा पुढे नेत आहे. खुशी कपूरने 'द आर्चीज' या चित्रपटातून पदार्पण केले होते, परंतु तिचे 'नादानियां' आणि 'लव्हयापा' यांसारखे प्रोजेक्ट्स फारसे यशस्वी ठरले नाहीत. अशा परिस्थितीत 'मॉम २' हा चित्रपट तिच्या करिअरमधील एक मोठा टर्निंग पॉईंट ठरेल का, याकडे सर्वांचं लक्ष आहे.

या चित्रपटात करिश्मा तन्ना आणि जिशू सेनगुप्ता हे देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. या थ्रिलर चित्रपटाचे दिग्दर्शन गिरीश कोहली करत आहेत. 'मॉम' चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी श्रीदेवी यांना मरणोत्तर 'राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते.



# ‘बटवारा’चा अंगावर काटा आणणारा ट्रेलर

भारताच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी आणि काळजाला भिडणाऱ्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित ‘बटवारा १९४७’ या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांनी केले आहे. जवळपास तीन दशकांनंतर सनी देओल आणि राजकुमार संतोषी यांची ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र येत आहे. या चित्रपटात सनी देओलसोबत प्रीती झिंटा, शबाना आझमी, करण देओल आणि अली फझल यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. १९४७ च्या भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित ‘बटवारा १९४७’ ही एका कुटुंबाची कथा आहे. बटवारा १९४७चा हा ट्रेलर फाळणीची शोकांतिका आणि सामान्य माणसांमधील माणुसकीची भावना दोन्ही प्रभावीपणे मांडतो. ‘बटवारा १९४७’ मध्ये शबाना आझमी, सनी देओल, प्रीती झिंटा, करण देओल, अली फझल आणि अभिमन्यू सिंग यांचा दमदार कलाकारांची मांदियाळी आहे. या चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखी वाढली आहे. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली तयार झालेल्या ‘बटवारा १९४७’ चे दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांनी केले आहे. चित्रपटाला ए. आर. रहमान यांनी संगीत दिले असून गीतकार जावेद अख्तर यांनी गीतलेखन केले आहे. आमिर खान आणि अपर्णा पुरोहित यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# योग्य मानधनासाठी संघर्ष करावा लागतो

अभिनेत्री शहनाज गिलने लोकप्रियता मिळूनही आजही योग्य मानधनासाठी संघर्ष करावा लागत असल्याचं सांगितलं. 'बिग बॉस १३'मध्ये सर्वात कमी मानधन मिळाल्याचा खुलासा करत तिने करिअरच्या सुरुवातीला अनेक कामं विनामूल्य केल्याचाही अनुभव शेअर केला. शहनाज म्हणाली, पैसा खूप महत्त्वाचा असतो. पैशामुळे माणसाला सन्मान मिळतो. आज मी माझ्या कामानुसार मानधन मागते. कधी ते मिळतं, तर कधी माझ्या अपेक्षेपेक्षा कमी मिळतं. पण प्रत्येकाने आपल्या हक्कासाठी लढलं पाहिजे. याआधी २०२३ मध्ये 'द कपिल शर्मा शो' मध्ये शहनाज म्हणाली होती, त्या शोमध्ये सर्वात कमी मानधन घेणारी मीच होते, पण बाहेर पडल्यानंतर सर्वात जास्त मानधन घेणारी झाले. पुढे शहनाजने सांगितलं की, करिअरच्या सुरुवातीच्या काळात तिने अनेक प्रोजेक्ट्स कोणतंही मानधन न घेता केले होते. मात्र, त्या कामामुळे तिला अपेक्षित सन्मान मिळाला नाही. ती म्हणाली, एक काळ असा होता की मी अनेकदा पैसे न घेता कामं केली आहेत. पण त्या कामामुळे सन्मान मिळत नाही. आता मात्र माझी किंमत मला माहीत आहे. त्यामुळे मी माझ्या हक्काच्या मानधनासाठी ठामपणे बोलते. एखाद्या चित्रपटाची कथा खूपच आवडली, तरच कधी तडजोड करते. तिने पुढे सांगितलं की, काही वेळा मानधन कमी मिळणार माहीत असतानाही चांगल्या कथेसाठी मी काम स्वीकारते. शहनाजने पंजाबी चित्रपटसृष्टीतून अभिनयाची सुरुवात केली. ‘सत श्री अकाल इंग्लंड’, ‘काला शाह काला’, ‘डाका’ आणि ‘हौसला रख’ यांसारख्या चित्रपटांनंतर तिने ‘किसी का भाई किसी की जान’मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर ती ‘थँक यू फॉर कमिंग’, ‘विकी विद्या का वो वाला व्हिडिओ’ आणि ‘इश्कनामा’ या पंजाबी चित्रपटात झळकली.

# रजनीकांत यांचा संघर्ष येणार पडद्यावर?

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार रजनीकांत यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास आता रुपेरी पडद्यावर पाहायला मिळण्याची शक्यता आहे. माध्यमांमध्ये सुरू असलेल्या चर्चेनुसार, त्यांच्या जीवनावर आधारित एका चित्रपटाची तयारी केले जात असून या प्रकल्पाबाबत लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रजनीकांत यांचा मनोरंजनविश्वात येण्याआधीचा प्रवास हा संघर्ष, मेहनत आणि जिद्दीचे प्रतीक मानला जातो. चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी त्यांनी बंगळुरू ट्रान्सपोर्ट सर्व्हिसमध्ये बस कंडक्टर म्हणून काम केले होते. सामान्य कुटुंबातून आलेल्या रजनीकांत यांनी अनेक अडचणींचा सामना करत अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले आणि पुढे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठ्या सुपरस्टारपैकी एक बनले. रिपोर्ट्सनुसार, रजनीकांत बऱ्याच काळापासून त्यांच्या जीवनावर पुस्तकाबाबत काम करत आहेत. या पुस्तकावर आधारित चित्रपटात त्यांच्या आयुष्यातील अनेक महत्त्वाचे टप्पे उलगडले जाणार आहेत. बस कंडक्टर म्हणून केलेला संघर्ष, अभिनय क्षेत्रात मिळवलेले यश आणि कॉलीवूडमध्ये सुपरस्टार बनण्यापर्यंतचा प्रवास. त्यांचा हाच प्रवास रुपेरी पडद्यावर आगामी चित्रपटाद्वारे पाहायला मिळणार असल्याचे बोलले जात आहे. माध्यमांच्या माहितीनुसार, या प्रकल्पाबाबत रजनीकांत यांनी आपल्या जवळच्या सहकार्यांशीही चर्चा केली आहे. मात्र, अद्याप निर्माते किंवा अभिनेत्याकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. दरम्यान, रजनीकांत यांच्या आगामी चित्रपटाबद्दल बोलायचे झाल्यास, ते लवकरच ‘जेलर २’मध्ये झळकणार आहेत. नेल्सन दिलीपकुमार दिग्दर्शित हा बहुप्रतिक्षित चित्रपट १५ ऑक्टोबर रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी त्यांचे लाखो चाहते उत्सुक आहेत.





# ऐश्वर्य ठाकरे साकारणार खलनायक!

हिंदी 'सैयारा' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये दमदार पदार्पण करणारा अभिनेता अहान पांडे आता आपल्या दुसऱ्या चित्रपटासाठी सज्ज झाला आहे. पहिल्याच चित्रपटातून रोमँटिक हिरो म्हणून प्रेक्षकांची पसंती मिळवलेल्या अहानचा यावेळी पूर्णपणे वेगळा अंदाज पाहायला मिळणार आहे. तो एका बिग बजेट ॲक्शन-रोमान्स चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार असून त्याच्यासोबत अभिनेत्री शर्वरी पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार आहे. या चित्रपटात बॉबी देओल आणि ऐश्वर्य ठाकरे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. विशेष म्हणजे, ऐश्वर्य ठाकरे या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटात त्यांचा आणि अहान पांडेचा जबरदस्त ॲक्शन सामना पाहायला मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या चित्रपटातील ॲक्शन सीन्सकडे चाहत्यांचे विशेष लक्ष लागले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अली अब्बास जफर करत असून निर्मितीची धुरा यशराज फिल्म्सचे प्रमुख आदित्य चोप्रा यांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नसले, तरी त्याच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित करण्यात आली आहे. हा चित्रपट २६ मार्च २०२७ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. अहान आणि शर्वरीची ही फ्रेश जोडी प्रेक्षकांसाठी मोठे आकर्षण ठरणार आहे. दोघेही पहिल्यांदाच एकत्र काम करत असल्याने त्यांच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीबद्दल चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. रोमँससोबतच दमदार ॲक्शन आणि मोठ्या प्रमाणावर चित्रीकरण करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. अली अब्बास जफर आणि आदित्य चोप्रा यांची जोडी याआधीही अनेक यशस्वी चित्रपट देऊन प्रेक्षकांची मने जिंकली आहे. 'मेरे ब्रदर की दुल्हन', 'गुंडे', 'सुलतान' आणि 'टायगर जिंदा है' यांसारख्या चित्रपटांनंतर हा त्यांचा पाचवा एकत्रित प्रकल्प आहे. त्यामुळे या चित्रपटाकडूनही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. 'सैयारा'च्या यशानंतर अहान पांडेला बॉलिवूडमधील नव्या पिढीतील आश्वासक अभिनेता म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे त्याच्या दुसऱ्या चित्रपटाकडेही चाहत्यांचे आणि चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, शर्वरीसाठीही हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. मोठ्या बॅनरखाली, मोठ्या कलाकारांसोबत काम करण्याची ही तिच्यासाठी मोठी संधी मानली जात आहे. रोमँस, ॲक्शन, नव्या जोडीची उत्सुकता आणि ऐश्वर्य ठाकरे यांची खलनायकाची भूमिका या सर्व गोष्टींमुळे या चित्रपटाची चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे. चित्रपटाचे शीर्षक आणि पहिली झलक कधी समोर येणार, याची चाहत्यांना उत्सुकता आहे. मात्र, २६ मार्च २०२७ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या अपेक्षा कितपत पूर्ण करतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# 'धूम ४'मध्ये दिसणार रणबीर कपूर?

'रामायण' चित्रपटाची टीम नुकतीच सॅन दिएगो कॉमिक- कॉनमध्ये आपल्या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी पोहोचली होती. या वेळी दिग्दर्शक नितेश तिवारी, निर्माते नमित मल्होत्रा आणि प्रमुख कलाकार रणबीर कपूर, यश उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान रणबीरने आपल्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल सांगितलं. शिवाय गेल्या अनेक वर्षांपासून रणबीर 'धूम ४' मध्ये दिसणार असल्याचं म्हटलं जात होतं. याविषयी त्याने खरं काय ते सांगितलं आहे. एका मुलाखतीत बोलताना सूत्रसंचालकाने उल्लेख केला की, यश 'टॉक्सिक' सोबत 'रामायण'मध्ये दिसणार आहे, तर रणबीर 'धूम ४' मध्ये दिसणार आहे. यावर रणबीरने लगेचच नकार देत म्हटले, नाही, सध्या मी 'रामायण' आणि संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'लव्ह अँड वॉर' या दुसऱ्या चित्रपटावर काम करत आहे. हा चित्रपट पुढील वर्षी जानेवारीत प्रदर्शित होऊ शकतो. अशाप्रकारे रणबीरने स्वतःच तो 'धूम ४' मध्ये दिसणार नाही हे सांगितलं आहे. त्यामुळे या चर्चांवर पडदा पडला आहे. 'लव्ह अँड वॉर' चित्रपटाच्या रिलीज डेटबाबत वेगवेगळ्या बातम्या समोर आल्या आहेत. काही रिपोर्ट्समध्ये २४ जानेवारी सांगण्यात आले आहे, तर अधिकृतपणे २१ जानेवारीची तारीखही समोर आली आहे. विशेष म्हणजे, रणबीरने आपल्या आगामी चित्रपटांची यादी सांगताना 'निमल पार्क'चाही उल्लेख केला नाही. हा चित्रपट त्याच्या २०२३ मधील सुपरहिट 'निमल' चित्रपटाचा सिक्वल असणार आहे. सध्या रणबीर कपूर संपूर्णपणे आगामी 'रामायण' चित्रपटावर लक्ष केंद्रित करतोय. 'रामायण' चित्रपटासंबंधी असलेल्या प्रत्येक इव्हेंटमध्ये रणबीर सहभागी आहे. हा चित्रपट यावर्षी दिवाळीत रिलीज होणार आहे. रणबीरसोबत साई पल्लवी, यश, सनी देओल, अरुण गोविल हे कलाकार झळकणार आहेत.



# ऋषभ शेट्टीच्या चित्रपटात भूमीची वर्णी

छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याचा इतिहास यावर आजवर अनेक चित्रपट बनले आणि त्यांना चांगला प्रतिसादही मिळाला. अशातच आता दाक्षिणात्य अभिनेता ऋषभ शेट्टीसुद्धा याच विषयावर आधारित चित्रपट बनवत असून यामधून तो बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. या चित्रपटात अनेक लोकप्रिय कलाकार झळकणार आहेत. अशातच आता याबद्दलची एक बातमी समोर आली आहे. 'कांतारा' आणि 'कांतारा चॅप्टर १' या चित्रपटांतून अनेकांचं लक्ष वेधणारा ऋषभ शेट्टी आता 'द प्राईड ऑफ भारत: छत्रपती शिवाजी महाराज' या बहुचर्चित चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार असून, आता या चित्रपटाशी संबंधित आणखी एक मोठी अपडेट समोर आली आहे. अभिनेत्री भूमी पेडणेकरची या चित्रपटात एन्ट्री झाली असून, निर्मात्यांनी याची अधिकृत घोषणा केली.

या चित्रपटात भूमी पेडणेकर योद्धा राणी बेलवाडी मल्लम्मा यांची भूमिका साकारणार आहे. बेलवाडी मल्लम्मा या त्यांच्या शौर्य, धैर्य आणि पराक्रमासाठी ओळखल्या जातात. वृत्तानुसार भूमी याबद्दल म्हणाली, महान मराठा योद्धे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आणि कार्यावर आधारित चित्रपटाचा भाग होणं, ही माझ्यासाठी मोठी सन्मानाची बाब आहे. कर्नाटकच्या शूर योद्धा राणी बेलवाडी मल्लम्मा यांची भूमिका साकारण्याची संधी मिळणं हे माझं भाग्य आहे. अभिनेत्री पुढे म्हणाली, मी कांताराची खूप मोठी चाहती आहे. ऋषभ शेट्टी यांच्या अप्रतिम अभिनयाने मला अक्षरशः भारावून टाकलं होतं. त्यामुळे संदीप सिंह यांनी या चित्रपटाची कथा सांगितली, तेव्हाच माझ्यातील अभिनेत्रीने क्षणाचाही विलंब न करता होकार दिला. आजवर मी अशा प्रकारची भूमिका कधीच साकारलेली नाही. माझ्यातील ही वेगळी बाजू ओळखून मला ही संधी दिल्याबद्दल मी चित्रपटाच्या निर्मात्यांची मनापासून आभारी आहे. 'द प्राईड ऑफ भारत: छत्रपती शिवाजी महाराज' या चित्रपटात ऋषभ शेट्टी आणि भूमी पेडणेकर यांच्यासह शेफाली शाह, अर्जुन रामपाल आणि विवेक ओबेरॉय महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. या चित्रपटाचं दिग्दर्शन आणि निर्मिती संदीप सिंह करत असून, हा चित्रपट ५०० कोटी रुपयांहून अधिक बजेटमध्ये दोन भागांत तयार केला जाणार आहे. पहिला भाग २०२७ मध्ये जानेवारीपर्यंत प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.



# मी घटस्फोटाची पोस्टर गर्ल होते!

अभिनेत्री सुचित्रा कृष्णमूर्तीने दिग्दर्शक शेखर कपूर यांच्यासोबतच्या घटस्फोटावर आणि त्यानंतर आलेल्या अडचणींवर मौन सोडलं आहे. अभिनेत्री सुचित्रा कृष्णमूर्तीने १९९९ साली दिग्दर्शक शेखर कपूर यांच्याशी लग्न केलं होतं. तिचा व शेखरचा २००७ साली घटस्फोट झाला. या जोडप्याला कस्तुरी कपूर नावाची एक मुलगी आहे. घटस्फोटानंतर सुचित्राला सुचित्राला ज्या परिस्थितीचा सामना करावा लागला, त्याबद्दल तिने भाष्य केलं. त्या काळी घटस्फोटावर आजच्यासारखी उघड चर्चा होत नव्हती. पण आपण घटस्फोटाबद्दल जाहीरपणे बोलल्यामुळे घटस्फोटाची पोस्टर गर्ल झाल्याचं सुचित्राने सांगितलं. सुचित्राने घटस्फोटाचा फटका मुलांना का बसू नये, याबद्दल भाष्य केलं. मला वाटतं की त्या काळात मी घटस्फोटाची पोस्टर गर्ल होते. लोक मला म्हणायचे, 'तू खूप बिनधास्त आहेस. शांत राहा, लोक दुखावले जातील.' पण आज प्रत्येकजण या विषयांवर उघडपणे बोलतो. स्वतःशी प्रामाणिक राहिले पाहिजे यावर माझा नेहमीच विश्वास राहिला आहे आणि मला कशाचाही पश्चात्ताप नाही. सुचित्रा पुढे म्हणाली, तुमच्या स्वतःच्या कटुतेमुळे किंवा वैयक्तिक समस्यांमुळे मुलाला त्याच्या आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित ठेवू नका. जोपर्यंत दुसरा पालक मुलांसाठी हानिकारक नसेल, तोपर्यंत मुलाला त्या प्रेमाचा पूर्ण अधिकार आहे, असं सुचित्रा म्हणाली. वडील हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग असतात. जर एखाद्या वडिलांना मुलाच्या आयुष्याचा भाग व्हायचं असेल आणि ते मुलावर प्रेम करत असतील, तर ते प्रेम मिळवण्याचा त्या मुलाला पूर्ण हक्क आहे, असं सुचित्रा सुचित्रा म्हणाली. सुचित्रा ही अवघी १९ वर्षांच्या असताना शेखर कपूर यांना भेटली होती आणि मग लग्न केलं. सुचित्रा व शेखरच्या वयात तब्बल ३० वर्षांचं अंतर होतं. शेखर कपूरच्या प्रेमात वेडे असल्याची कबुली सुचित्राने अनेकदा दिली होती. जोपर्यंत आपण लग्न करत नाही तोपर्यंत मी भेटणार नाही, असं सांगून सुचित्राने शेखरला लग्नासाठी तयार केलं होतं. वयातील अंतर आणि शेखर कपूर यांचे पहिले लग्न यामुळे सुचित्रा यांच्या कुटुंबाचा विरोध होता, तरीही ती फक्त २२ वर्षांची असताना दोघांनी लग्न केलं होतं. लग्न केल्यानंतर दोघांचा संसार मात्र सुखाचा झाला नाही. लग्नाच्या पहिल्याच वर्षी घटस्फोट घ्यायचा होता, पण सुचित्रा गरोदर असल्याने त्यांनी काही वर्षे एकत्र राहायचं ठरवलं. लग्नानंतर शेखरचे इतर प्रेमसंबंध सुरू होते. पण लग्न त्यांच्या बेवफाईमुळे नाही तर नात्यातील आदर मिळत नसल्यामुळे संपले, असं सुचित्राने म्हटलं होतं.



# भाईजानच्या मेहुण्याला मिळेना सिनेमात काम!

बॉलीवूड अभिनेता व सलमान खानचा मेव्हणा आयुष शर्मा याने काही सिनेमांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. मात्र, आतापर्यंत त्याला एकही हिट चित्रपट मिळालेला नाही. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आयुषने चांगल्या चित्रपटांच्या ऑफर्स मिळत नसल्याची खंत व्यक्त केली. एका मुलाखतीमध्ये आयुष शर्माने सांगितले की, सलमानभाईनं माझा पहिला चित्रपट 'लव्हयात्री' प्रोड्युस केला होता. त्यानंतर मला वाटलं होतं की, एखादी चांगली फिल्म ऑफर येईन; पण तसं झालं नाही. 'लव्हयात्री'मधील माझ्या अभिनयाचं योग्य प्रकारे कौतुक झालं नव्हतं. त्यामुळे त्यानंतर मी पुन्हा अभिनय शिकण्यासाठी ॲक्टिंग स्कूलमध्ये गेलो आणि स्वतःवर पुन्हा मेहनत घेतली. जवळपास तीन वर्षं वाट पाहिल्यानंतर 'अंतिम' चित्रपट आला. सलमान खान यांच्या अंतिम या सिनेमामध्ये काम केलं. त्या चित्रपटानंतर मला चांगल्या ऑफर्स मिळतील, असं वाटलं होतं; पण तसं काहीच घडलं नाही. मला सातत्यानं चांगल्या चित्रपटांमध्ये काम करायचं आहे; पण हा एक संघर्षाचा प्रवास आहे. मला अजूनही पाहिजे तसं यश मिळालेलं नाही, याच मुलाखतीत आयुषने सलमान खानबरोबर झालेल्या पहिल्या भेटीची आठवणही सांगितली. तो म्हणाला, जेव्हा मी सलमानभाईंना पहिल्यांदा भेटलो तेव्हा मी स्ट्रगल करणारा अभिनेता होतो. तेव्हा सलमान मला म्हणाले, 'तू चांगला अभिनेता बनू शकतोस.' त्यामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला. पण, त्याच वेळी सलमाननं स्पष्टपणे सांगितलं, 'पण सध्या तुझी अवस्था खूप वाईट आहे, तू अजिबात तयार नाहीस. तुला अनेक गोष्टींवर मेहनत घ्यावी लागेल.' त्यानंतर मी अभिनयाकडे गंभीरपणे पाहू लागलो. सलमानची बहीण अर्पिता आणि आयुष यांचं १८ नोव्हेंबर २०१४ रोजी लग्न झाले. आयुष शर्मा माजी केंद्रीय मंत्री सुखराम यांचा नातू आहे.



# महेश बाबू साकारणार विष्णूंची भूमिका?



नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर भगवान विष्णूंची भूमिका नेमकी कोण साकारत आहे, याबद्दल सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. रणबीर कपूरसह दोन लोकप्रिय अभिनेत्यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. मात्र, निर्मात्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. रणबीर कपूर मुख्य भूमिकेत असलेला आणि लोकप्रिय कलाकारांची तगडी स्टारकास्ट असलेला नितेश तिवारी दिग्दर्शित बहुचर्चित 'रामायण' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. ट्रेलर रिलीज झाल्यानंतर सोशल मीडियावर एका नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. ट्रेलरमध्ये भगवान विष्णूंच्या भूमिकेत नेमका कोणता अभिनेता दिसतोय? याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटात रणबीर कपूर श्रीराम आणि परशुराम या दोन भूमिका साकारणार असल्याचं आधीच स्पष्ट झालं आहे. मात्र, ट्रेलरमध्ये काही क्षणांसाठी दिसणाऱ्या भगवान विष्णूंच्या सीनमुळे ही भूमिका कोणता अभिनेता साकारत आहे याबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुक्ता निर्माण झाली आहे. सोशल मीडियावर अनेक जण हा अभिनेता नेमका कोण आहे, यावर चर्चा करत असून विविध नावं पुढे आली आहे. ट्रेलरमधील या छोट्याशा दृश्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. ट्रेलरमध्ये भगवान विष्णूंच्या भूमिकेत दिसणारा अभिनेता नेमका कोण, याबाबत वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात आहेत. काही प्रेक्षकांच्या मते, ही भूमिका सौरभ राज जैनने साकारली आहे. 'महाभारत' मालिकेत भगवान श्रीकृष्णाची भूमिका साकारून सौरभ राज जैनने प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. त्यामुळे ट्रेलरमध्ये दिसणाऱ्या भगवान विष्णूंच्या लूकची तुलना चाहते त्याच्या लूकशी करत आहेत.

# प्रभासच्या 'स्पीरीट'मध्ये कतरिना ?

दक्षिणमधील अभिनेता प्रभासचा 'स्पिरीट' सिनेमा अनेक कारणांमुळे चर्चेत आहे. संदीप रेड्डी वांगा यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या या सिनेमात आधी दीपिका पादुकोणची वर्णी लागली होती. मात्र दीपिकाने लेकीच्या जन्मानंतर ८ तासांच्या शिफ्टची मागणी केली होती ज्याची खूप चर्चा झाली. तेव्हा दीपिकाला याच सिनेमातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता. नंतर सिनेमात दीपिकाच्या जागी तृप्ती डिमरीची वर्णी लागली होती. तर आता 'स्पिरीट'मध्ये कतरिना कैफचा कॅमिओ असू शकतो अशी चर्चा रंगली आहे. कतरिना कैफने काही महिन्यांपूर्वीच मुलाला जन्म दिला. सध्या ती लेकाच्या संगोपनात व्यग्र आहे. त्याआधीही कतरिना मोठ्या पडद्यावरुन जणू गायबच होती. २०२४ साली आलेल्या 'मेरी ख्रिसमस' सिनेमात ती शेवटची दिसली. या सस्पेन्स सिनेमात ती विजय सेतुपतिसोबत झळकली. आता कतरिनाच्या 'स्पिरीट'मधील कॅमिओची चर्चा आहे. नुकताच असा दावा करण्यात आलेला की 'स्पिरीट'मध्ये कतरिना कैफची छोटी भूमिका असेल. मात्र अजूनही तिच्या सिनेमातील एन्ट्रीवर सस्पेन्स आहे. सध्या ती मेकर्ससोबत वर्किंग वेळांवर चर्चा करत आहे. कतरिनाला 'स्पिरीट'मधील कॅमिओसाठी संपर्क करण्यात आला. कारण सध्या शेड्युलिंगवर गोष्टी अडकल्या आहेत. कतरिनाला या कॅमिओ शूटसाठी पाच दिवस द्यावे लागणार आहेत. यातही ती मर्यादित वेळेतच शूट करु शकते असं ती म्हणाली. याबाबत सध्या संदीप रेड्डी वांगासोबत तिची चर्चा सुरु आहे. तिच्या वेळा जुळून आल्या तरच कतरिना 'स्पिरीट'चा भाग होऊ शकते. कतरिनाने अद्याप 'स्पिरीट'साईन केलेला नाही. मात्र तिला पुन्हा बिग स्क्रीनवर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. कतरिना सध्या घर-संसार आणि तिच्या बिझनेसमध्येच रमली आहे. नुकतीच आई झाल्याने ती लेकाला जास्तीत जास्त वेळ देऊ इच्छिते सोबतच तिला फिटनेसवरही काम करायचं आहे. प्रभासचा 'स्पिरिट' पुढील वर्षी ५ मार्च रोजी रिलीज होणार आहे. हा पॅन इंडिया प्रोजेक्ट असून हिंदी, तेलुगु, तमिळ, मल्याळम, कन्नडसह अनेक भाषांमध्ये रिलीज होणार आहे.





# 'राका'मधून धुमाकूळ घालणार अल्लू अर्जुन

साउथ सुपरस्टार अल्लू अर्जुनने आतापर्यंत 'पुष्पा' बनून बॉक्स ऑफिस गाजवलं. आता मात्र तो एकदम वेगळ्या अंदाजात दिसणार आहे. 'राका' या आगामी सिनेमाची चर्चा आहे. यामध्ये अल्लूचा खतरनाक लूक आहे. सोबतच दीपिका पादुकोण दमदार ॲक्शनमध्ये दिसणार आहे. ॲटलीने सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. सिनेमाचं शूट आता शेवटच्या टप्प्यात आलं आहे. यानंतर अल्लू अर्जुन हा कनगराज यांच्या सिनेमाची तयारी सुरु करणार आहे. दरम्यान 'राका' सिनेमा दोन पार्टसमध्ये बनणार असल्याची चर्चा आहे. अल्लू अर्जुन सध्या 'राका'च्या चित्रीकरणात व्यग्र आहे. मेकर्सने अद्याप सिनेमाच्या रिलीज डेटचा खुलासा केलेला नाही. मात्र हा सिनेमा मोठ्या लेवलवर बनवला जात असून बराच पैसाही लावण्यात आला आहे. तेलुगु ३६० नुसार, सिनेमाचं शूट यावर्षाखेपर्यंत संपवण्याचं प्लॅनिंग आहे. तर आता टीमने सिनेमा दोन पार्टसमध्ये रिलीज करण्याचा निर्णय घेतला आहे. ॲटली, अल्लू अर्जुन आणि सन पिक्चर्सने एकत्र प्लॅनिंग केलं आहे. दीपिका प्रेग्नंसीमध्येही 'राका'साठी ॲक्शन शूट करत आहे. सात महिन्यांच्या गरोदर अवस्थेतही ती मेहनत घेत आहे. याचे काही फोटोही व्हायरल झाले होते. तसंच सिनेमाच्या इतर कास्टविषयी अद्याप माहिती आलेली नाही. 'राका' हा एटली दिग्दर्शित महत्त्वाकांक्षी सायन्स- फिक्शन फँटसी ॲक्शन चित्रपट आहे. या चित्रपटात अल्लू अर्जुन आणि दीपिका पदुकोण प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. या पॅन इंडिया चित्रपटात भव्य व्हिज्युअल्स आणि दमदार ॲक्शनचा अनुभव प्रेक्षकांना मिळणार आहे. 'राका' हा २०२७ मधील सर्वाधिक बहुप्रतीक्षित सिनेमांपैकी एक मानला जात आहे.



# पूजा अन् वैभव पुन्हा एकत्र!

'भेटली तू पुन्हा' हा रॉमकॉम सिनेमा ९ वर्षांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात पूजा सावंत आणि वैभव तत्त्ववादी यांची जोडी प्रेक्षकांना पाहायला मिळाली होती. या दोघांच्या ऑनस्क्रीन जोडीला चाहत्यांचं भरभरून प्रेम मिळालं. 'भेटली तू पुन्हा'मधील गाणी सर्वत्र विशेष गाजली. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या याच प्रेमामुळे या सिनेमाच्या टीमने एक आनंदाची बातमी सर्वांबरोबर शेअर केली आहे. 'भेटली तू पुन्हा' या सिनेमाचा दुसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. वैभव आणि पूजा या दोघांनीही यासंदर्भात इन्स्टाग्राम पोस्ट शेअर केल्या आहेत. ९ वर्षांपूर्वी एका लग्नाची लव्ह स्टोरी तुम्ही आपलीशी केलीआणि आपली गोष्ट आपण कधी एकदाच ऐकतो का? काही कथा संपत नाहीत त्या लोकांच्या हृदयात कायमस्वरुपी आपली एक जागा निर्माण करतात. 'भेटली तू पुन्हा' या सिनेमावरचं तुमचं प्रेम आजही तसंच आहे तुम्हा सर्वांचे मेसेज, विनंती आणि तुम्ही दाखवलेला विश्वास यामुळेच आम्ही एक निर्णय घेतलाय. 'भेटली तू पुन्हा २'! अशी पोस्ट शेअर करत वैभवने या दुसऱ्या भागाची पहिली झलक चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. वैभवने शेअर केलेल्या पोस्टवर चाहत्यांसह मराठी कलाकारांनी सुद्धा कौतुकाचा वर्षाव केला आहे. आम्ही खूप दिवस याची वाट पाहत होतो, पूजा-वैभव तुम्हाला खूप खूप शुभेच्छा आम्ही खरंच तुम्हाला पाहण्यासाठी खूप आतुर होतो, मोस्ट फेव्हरेट जोडी, फायनली वैभव तुझे डोळे बोल-के आहेत, आम्ही वाट पाहू, अशा प्रतिक्रिया कलाकारांच्या पोस्टवर आल्या आहेत. आता 'भेटली तू पुन्हा २' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला केव्हा येणार? पूजा आणि वैभव यांच्यासह यामध्ये कोणकोणते कलाकार झळकणार याचा उलगडा लवकरच टीमकडून केला जाईल. 'भेटली तू पुन्हा २'मध्ये प्रेक्षकांना नेमकं काय पाहायला मिळेल, पूजा आणि वैभवचा लूक यामध्ये कसा असेल असे बरेच प्रश्न सध्या चाहत्यांच्या मनात निर्माण झाले आहेत. येत्या काही दिवसांतच या सगळ्याची उत्तरं प्रेक्षकांना मिळून जातील. आता 'भेटली तू पुन्हा २' सिनेमा केव्हा प्रदर्शित होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# 'सायको रंगा' सिनेमाचा टीझर प्रदर्शित

सध्या अनेक सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. हिंदी, मराठी, तमिळ अशा विविध भाषांतील सिनेमांचा यात समावेश आहे. 'धमाल ४', 'द ओडीसी', 'जन नायकन' अशा सिनेमांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता आणखी एक नवीन मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'सायको रंगा' असे या सिनेमाचे नाव आहे. नुकताच या सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. या सिनेमात अनेक कलाकार आहेत. ट्रेलरच्या सुरुवातीला शर्यत पाहायला मिळते. काही ॲक्शन सीन पाहायला मिळतात. काही रोमँटिक सीन पाहायला मिळतात. मारामारी पाहायला मिळते. गाणी, डान्स, भावनिक क्षण पाहायला मिळतात. हीरोचा शेवटी एक डायलॉग ऐकायला मिळतो. हीरो म्हणतो, लक्षात ठेवा, ही शेतकर्याची काळी माती पेटली ना, तर अख्ख्या देशाची राख होईल. त्यानंतर तो एका माणसाच्या कानाखाली मारताना दिसतो. हा व्हिडीओ शेअर करताना, अन्यायाविरुद्ध पेटून उठलेला एक धगधगता ज्वालामुखी. नियम तो मोडत नाही आणि कोणी मोडला तर त्याला सोडत नाही. 'सायको रंगा'चे लेखन देवेंद्र चौगुले यांनी केले आहे. हा सिनेमा सप्टेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. सिनेमात आनंद काळे, सुबोध भावे, जान्हवी किल्लेकर, स्मिता गोंदकर, पुष्कर जोग असे अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसत आहेत. प्रत्येकाची भूमिका लक्ष वेधून घेत आहे. स्मिताचा एक डान्सही असल्याचे समोर आलेल्या टीझरमध्ये पाहायला मिळत आहे. जान्हवी किल्लेकरने मालिका तसेच 'बिग बॉस'सारखा रिॲलिटी शो या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. आता या सिनेमात तिची भूमिका काय असणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.





# सिनेमा न चालण्याचं खापर प्रेक्षकांवर फोडू नये!

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय दिग्दर्शकांपैकी एक असणारे दिग्दर्शक म्हणजे विजू माने. बालनाट्यापासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या विजू यांनी गंभीर, विनोदी अशा वेगवेगळ्या धाटणीच्या चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. 'पांडू', 'शर्यत', 'बायोस्कोप' यांसारखे चित्रपट त्यांनी सिनेसृष्टीला दिले. विजू माने सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहेत. सिनेमा न चालण्याचं खापर प्रेक्षकांवर फोडू नये असं रोखठोक मत त्यांनी व्यक्त केलं आहे. विजू माने यांनी आपलं स्पष्ट मत मांडलं. मराठी चित्रपट न चालल्यास त्यासाठी प्रेक्षक जबाबदार असतात का? या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले, अजिबात नाही. मी कधीही प्रेक्षकांना दोष दिलेला नाही आणि पुढेही देणार नाही. एखादा मराठी चित्रपट चालला नाही, तर ती चूक प्रेक्षकांची नसून निर्माते, दिग्दर्शक आणि चित्रपट बनवणार्या टीमची असते. पुढे ते म्हणाले, प्रेक्षकांना एखादा चित्रपट पाहावासा वाटला नाही, तर त्यामागे काहीतरी कारण असतं. अजचा प्रेक्षक अत्यंत जागरूक आहे, तो पैसे खर्च करून वेळ काढून चित्रपटगृहात येतो. त्यामुळे त्याला चांगला अनुभव मिळणं अपेक्षित असतं. चित्रपटाच्या यशात केवळ कथाच नव्हे, तर त्याची सादरीकरणाची पद्धतही महत्त्वाची असल्याचं सांगत त्यांनी म्हटलं, टीझर, ट्रेलर, मार्केटिंग आणि चित्रपटाची एकूण मांडणी यांमधून प्रेक्षकांचा विश्वास जिंकला, तर ते नक्की चित्रपटगृहात येतात. यावेळी त्यांनी चित्रपट चालला नाही, तर आरशात स्वतःकडे पाहण्याची गरज असते; प्रेक्षकांकडे बोट दाखवण्याची नाही असं रोखठोक मत विजू माने यांनी व्यक्त केलं.



**तुम्ही मेरे मंदिर, तुम्ही मेरी पूजा तुम्ही यांच्या मधुर तरल व आर्तस्वरातील ही विरहिणी देवता हो... (१९६५ - खानदान). अपंग पतीबद्दल प्रेमपूर्वक वात्सल्य, स्वरात भिजलेली गानकोकिळेची उदात्त, कोमल, उत्तुंग रागिणी. एकांतात निर्जन ठिकाणी एकाग्रतेने ऐकण्याची मजाच काही और! अभिनय सम्राज्ञी नूतन, करवाचौथच्या दिवशी नवर्याला देवस्थळी मानून निस्सीम भक्तीचा आविष्कार सादर करते. संथ स्वरात सुरू झालेले ध्रुपद, नंतर थोडे तात कडव्यांची सजावट रवी यांनी शिताफीने केली आहे. या प्रेमगीताला लोरीचा उत्कृष्ट बाजही साधला आहे. इंटर ल्यूड संगीतात बासरी, सारंगी व संतूर यांची कोमल सिम्फोनी साधून आपली प्रतिभा सिद्ध केली आहे.**

# स्वरमाधुर्य आणि भावनांचे शिल्पकारः संगीतकार रवी



**चौदहवी का चाँद हो या आफताब हो... (१९६० - चौदहवी का चाँद)**

६५-६६ वर्षांपूर्वीचे रवी यांचे हे गाणे आजही आपले माधुर्य व दर्जा राखून आहे. मजुल्फे है जैसे झील मे हसता हुवा कमल। आँखे है जैसे मय प्याले भरे हुये...।। शकील बदायुनी यांच्या दर्जेदार काव्याला संगीत देताना रवी यांनी शाब्दिक संहितेच्या मर्यादा व शब्दांनी प्रसवणारा मूड अभ्यासला होता तसेच संगीतकलेचे अंगभूत गुणधर्म, मोहकपणा व सौंदर्य याचीही जाण होती. म्हणूनच कसलेही दडपण न घेता शब्दांनी स्थापिलेला मूड मोहम्मद रफी यांच्या स्वरांच्या पिसार्याने अधिकच फुलविला व एक अजरामर गाणे जन्मास घातले.

**लागे ना मोरा जिया सजना नही आये...(१९६०-घुंघट)**

प्रेमभंग अवस्थेतील औदासीन्यात लता यांच्या मधुर तरल व आर्तस्वरातील ही विरहिणी रवि यांच्या दिव्य संगीताचा अविष्कारच आहे. रवी यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे संगीत गायकाच्या आवाजाला कधीच दडपत नसे. कानात गुंजारव करणारे हे गाणे आहे.

**ओ मेरी जोहराजबी तुझे मालूम नही... (१९६५- वक्त)**

वरील शब्दप्रधान गाण्यात शब्दातील अर्थवाहकता ध्वन्यर्थात प्रकट करण्यासाठी या अभ्यासू संगीतकाराने प्रत्येक शब्दावर स्वरांची चपखल पकड बसावी म्हणून शास्त्रीय स्वरांचे माहीर गायक मन्नाडे यांची निवड केली. सा रे ग म प ध नि या सप्त स्वरांचा संमिश्र वापर करण्यास्तव पिलू रागात व केहरवासारखा चपळ व ठेक्याचा ताल वापरून गाण्यात रोमँटिक व उत्साही मूड उजागर करून गाण्यात रंगत आणली. व्यवसायात आलेल्या यशाच्या आनंदात उतारवयातल्या पत्नीच्या सौंदर्याचे वर्णन मिस्कीलपणे करणारे हे गीत अजरामर झाले.

**चंदा मामा दूर के पुए पकाये बूरके... (१९५५- वचन)**

मांड रागात लयबद्ध संगीतात आशा भोसले यांच्या स्वरसाजात रचलेले गाणे एक प्रकारे सदाबहार लोरीच्या साजात सजलेले हे बालगीत त्या काळात भारतभर प्रसिद्ध झाले होते. लहान मुलाला चंदामामाच्या सुरस गोष्टीत भुलवून अतिशय वात्सल्याने या गाण्यावर गीता बाली यांनी पडद्यावर अभिनय सार्थ केला होता. रवी यांनी स्वतंत्र संगीत दिलेला हा पहिला चित्रपट होता.

**ऐ मेरे दिले नादान तू गम से ना घबराना... (१९६२- टॉवर हाऊस)**

रवी यांनी गीतकार असद भोपाली यांच्या धीरोत्कट शब्दांना लता यांच्या धीरगंभीर स्वरात गंभीर डूब देऊन हे मधुर गाणे प्रसिद्ध केले. पडद्यावर एका हॉलमध्ये येरझाऱ्या घालत कुरळ्या केसांची व मनमोहक सौंदर्याची नायिका शकिला ओष्टद्वयांच्या व चेहऱ्यावरील सहज अभिनयाने ताल धरते. हे गाणे बँकग्राऊंडमध्ये आहे. कधी बासरी, कधी व्हायोलीन, कधी सतारीच्या स्वरांनी गाण्यातील गूढगंभीर रहस्यमयी आशय टिकवून हे संपूर्ण गाणे ऐकणाऱ्याला तरंगत ठेवते. ही रवी यांची किमया.

**ए नील गगन के तले धरती का प्यार पले... (१९६७- हमराज)**

प्रत्येक कडव्यात निसर्गातील विविध छटांमधील रोज फुलणारे प्रेम साहिर यांनी उत्कटपणे पेरून काव्य दर्जेदार केले. जसे शबनम व फूल, लता व वृक्ष, नदी व सागर.

महेंद्र कपूर जणू आसमंताला साद घालून या युगलगीताला सुरुवात करतात. नायक महेंद्र कपूर यांच्या स्वरात निसर्गात अव्याहत चालणार्या प्रेमाची जाणीव नायिकेला करून देतो. रवी यांनी भोपाली रागात, व्हायोलीन बासरी व हार्मोनियमच्या साथीत महेंद्र कपूर यांच्या तरल स्वरात हे गाणे अक्षरशः पालखीत बसवले आहे.

बाबुल की दुवाये लेती जा जा तुझको सुखी संसार मिले... साहिर यांचे विरह भावनेने भिजलेले हृदयस्पर्शी बोल मोहम्मद रफी यांचा ओथंबलेला आर्त स्वर व रवी यांच्या कारुण्यदर्शित संगीतात चिंब बुडालेले हे गाणे ऐकताना थिएटरमध्ये सहृदय प्रेक्षकांचे डोळे अश्रूंनी भिजले जात. सतार व बासरीच्या सुरात बिदाईच्या प्रसंगाला साजेशा संगीतात स्वरराज रफींच्या विव्हळ स्वरांमुळे हे गाणे अजरामर झाले.

३ मार्च १९२६ रोजी रविशंकर कन्हय्यालाल शर्मा यांचा जन्म दिल्ली येथे झाला. संगीताचे रीतसर शिक्षण घेतले नाही, पण संगीताची आवड स्वस्थ बसू देईना. दिल्ली रेडिओवर गाणी म्हटलीत. पुढे जाऊन हिंदी चित्रपटात थोडी गाणी म्हटलीत. १९५० साली मुंबईस येऊन हेमंतकुमारचे सहायक झाले व कोरसमध्ये गाणी गाऊ लागले. मन डोले मेरा तन डोले... नागीण मधील गाण्यात सर्वप्रथम बीनचा आवाज हार्मोनियमवर रवी यांनी काढला.

कल्याणजी यांनी क्ले व्हायोलीनवर हार्मोनियमच्या स्वरांना उठाव आणला. १९५५ साली सर्वप्रथम मवचनफ चित्रपटास स्वतंत्र संगीत दिले. त्यांनी हिंदीत ९२, मल्याळम १४ व इतर भाषांत मिळून ११३ चित्रपटास संगीत दिले. १९४६ साली त्यांचा विवाह झाला. दोन मुली व एका मुलाचे पालक झालेत. मराठीतील वर्षा उसगावकर त्यांच्या सूनबाई आहेत. अनेक पुरस्कारांचे संगीतकार रवी मानकरी ठरले.

फिल्मफेअर- घराना (१९६२) व खानदान (१९६५). राष्ट्रीय पुरस्कार - मल्याळम चित्रपट दोन वेळा. लता मंगेशकर पुरस्कार (१९९८). भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार (१९७१). मिळाला आहे. ७ मार्च २०१२ रोजी रवी नामे चित्रपटातील खर्या रवीचा अस्त झाला, परंतु त्यांनी म्हणून ठेवल्याप्रमाणे ते पुन्हा येतील, ही आशा करू या...

**रमेश पोफळी**



# आता धनुषची राजकारणात एन्ट्री?

साउथ सिनेइंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेता थलपती विजयनंतर तमीळ सिनेमा जगतातील लोकप्रिय अभिनेता आणि दिग्दर्शक धनुष राजकारणात पदार्पण करणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. रविवारी त्याच्या फॅन्स क्लबद्वारे आयोजित एका रक्तदान शिबिरात धनुषने केलेल्या विधानामुळे पुन्हा एकदा राजकारणात एन्ट्री करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले. धनुषने यावेळी चाहत्यांच्या एकजुटीचे भरभरून कौतुक केले. ही सामूहिक ताकद केवळ चित्रपटांचे ऑडिओ लाँच किंवा फॅन मीटपुरती मर्यादित न ठेवता समाजसेवेत लावायला हवी, असे तो म्हणाला. त्याने आपल्या चाहत्यांना आवाहन केले की, त्यांनी आसपासच्या लोकांच्या आणि कुटुंबांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शक्य ती सर्व मदत करावी. धनुषच्या या विधानानंतर थलपती विजयनंतर आता तोही तमिळनाडूच्या राजकारणात पाऊल ठेवू शकतो, या चर्चेने सोशल मीडियावर उधाण आले आहे. या कार्यक्रमाचा व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल होताच चाहत्यांनी आणि लोकांनी तर्क-वितर्क लावायला सुरुवात केली. 'एक्स'वर (ट्विटर) अनेक युजर्सनी धनुषच्या राजकारणात येण्याच्या शक्यतेवर आपल्या प्रतिक्रिया दिल्या. एका युजरने फिरकी घेत लिहिले, राजकारणात जाणाऱ्यांची रांग आता लांब होत चालली आहे असं दिसतंय आणि प्रत्येक जण विजयच्या पाऊल वाटेवर चालू इच्छितोय. तर दुसऱ्या एका युजरने धनुषचे स्वागत करत लिहिले, तमिळनाडूला एका सुशिक्षित आणि शिस्तबद्ध नेतृत्वाची गरज आहे. काही चाहते तर धनुष लवकरच स्वतःच्या नवीन राजकीय पक्षाची घोषणा करू शकतो, असा अंदाजही लावत आहेत.याच कार्यक्रमादरम्यान धनुषने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवरून सुरू असलेल्या वादावरही भाष्य केले. २०२४ मध्ये त्याने दिग्दर्शित केलेल्या 'रायन' या चित्रपटापेक्षाही चांगले तमिळ चित्रपट होते, हे त्याने मोकळेपणाने मान्य केले. धनुषला 'कॅप्टन मिलर' चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी 'स्पेशल मेंशन' मिळाला, तर त्याच्या 'रायन' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट तमीळ चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पुरस्कारांच्या या घोषणेनंतर धनुषने दिग्गज अभिनेते ममुटी यांच्यासोबत आनंद साजरा केला आणि 'ओम' चित्रपटाच्या सेटवरील दोघांचा एक आठवणीत राहण्याजोगा फोटोही समोर आला आहे.

# भयपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार जान्हवी

जान्हवी कपूर ही बॉलिवूडमधील उदयोन्मुख अभिनेत्रींपैकी एक आहे. जान्हवीने बॉलिवूड तसेच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत स्वत:चा ठसा उमटविला आहे. अलिकडेच ती राम चरणची मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'पेड्डी'मध्ये दिसून आली आहे. याचदरम्यान जान्हवी आता एका भयपटात काम करत असल्याचे समोर आले आहे.

जान्हवीने स्वत:च्या पुढील प्रोजेक्ट्ससाठी कहाण्या ऐकण्यास सुरुवात केली अहो. २०२१ मध्ये प्रदर्शित चित्रपट 'रुही'नंतर जान्हवी पुन्हा भयपटाकडे वळली आहे. हा एक क्रीचर (प्राणी) हॉरर असेल, ज्यात घाबरविण्यासाठी एक नव्या प्रकारचा प्राणी कहाणीत सामील असेल. २०१४ मध्ये प्रदर्शित चित्रपट 'क्रीचर' देखील काहीसा असाच चित्रपट होता. नव्या चित्रपटाचे दिग्दर्शन राही अनिल बर्वे करणार आहे. त्यांना तुंबाड चित्रपटासाठी ओळखले जाते. जान्हवीचा हा चित्रपट जियो स्टुडिओजकडून निर्माण केला जाणार आहे. जान्हवीला या चित्रपटाची कहाणी पसंत पडली आहे. याचे चित्रिकरण चालू वर्षीच सुरू केले जाणार आहे. जान्हवी आगामी काळात आणखी एका दाक्षिणात्य सुपरस्टारसोबत दिसून येणार आहे. अल्लू अर्जुनचा चित्रपट 'राका' मध्ये ती दीपिका पदूकोनसोबत काम करत आहे.




# क्रितीला साकारायचीयं वेडी मुलगी

अभिनेत्र क्रिती सेनन ही एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. अनेक सिनेमांमध्ये तिने काम केले आहे. ती म्हणते की, अपारंपरिक भूमिका साकारून स्वत:ला आव्हान देण्यासाठी ती उत्सुक आहे. या अभिनेत्रीने कबूल केले की तिला नेहमीच्या चौकटीबाहेर जाऊन काम करायचे आहे आणि विशेषत: तिला मानसिकदृष्ट्या आव्हानात्मक भूमिका साकारायला आवडतात. तिने सांगितले की, तिला पडद्यावर एका 'सायको चिक'ची भूमिका साकारायला आवडेल. क्रिती सेननने नुकतेच माध्यमांशी संवाद साधला आणि भविष्यात तिला कोणत्या प्रकारच्या भूमिका साकारायच्या आहेत हे सांगितले. तिने उघड केले की, 'ऑब्सेशन' हा मानसशास्त्रीय चित्रपट पाहिल्याने तिला पटकथा निवडीच्या तिच्या दृष्टिकोनावर पुनर्विचार करण्याची प्रेरणा मिळाली. चित्रपटाच्या प्रभावाबद्दल बोलताना कृती म्हणाली, जेव्हा मी 'ऑब्सेशन' पाहिला, तेव्हा मला वाटले, 'अरे देवा, आपल्याला सुरक्षित मार्ग अवलंबणे थांबवावे लागेल. आपल्याला काहीतरी वेगळे करावे लागेल.' त्यामुळे मी खूप उत्साहित झाले. क्रिती सेननला एक 'सायको' पात्र साकारायचे आहे. या अभिनेत्रीने झेंडायासारख्या कलाकारांनाही श्रेय दिले, ज्यांनी त्यांच्या उत्कृष्ट अभिनयाने आणि कठीण भूमिका साकारण्याच्या धैर्याने तिला प्रेरणा दिली आहे. कृतीने तिच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वापेक्षा पूर्णपणे वेगळे पात्र साकारण्याची इच्छा व्यक्त केली. ती म्हणाली, मला एक वेडसर पात्र साकारायचे आहे. क्रिती सेनन म्हणाली, भूमिकांच्या बाबतीत मला सुरक्षित मार्ग निवडायचा नाही. एक अभिनेत्री म्हणून, स्वत:च्या आयुष्यापेक्षा पूर्णपणे वेगळे आयुष्य जगणे आणि आपण नसलेल्या व्यक्तीला शोधणे हे रोमांचक असते. मला मनोरुग्ण पात्र साकारायला नक्कीच आवडेल. कामाच्या आघाडीवर, कृती अलीकडेच 'कॉकटेल २' मध्ये दिसली होती.



# हॉलिवूडसाठी दिशा सज्ज



बॉलिवूडमधी बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनी आता हॉलिवूडमध्ये पाऊल ठेवण्यास तयार आहे. प्रियांका चोप्रा, दीपिका पदूकोन, अली फजल आणि अनुपम खेर यासारख्या कलाकारांप्रमाणे आता दिशा पाटनी देखील हॉलिवूडमध्ये स्वत:ची क्षमता सिद्ध करू पाहत आहे. ऑस्करविजेते केविन स्पेसी यांच्या दिग्दर्शनात तयार होणार सुपरनॅचरल थ्रिलरपट 'हॉलिगार्ड सागा : द पोर्टल ऑफ फोर्स'मध्ये दिशा दिसून येणार आहे. पाश्चिमात्य देशांमधील चित्रपट ऑडिशनवर प्रामुख्याने निर्भर असतो. तेथे काम मिळविण्यासाठी आम्हाला ऑडिशन द्यावी लागते. यात कधीकधी ते तुमचे पूर्वीचे काम पाहतात आणि तुम्हाला प्रोजेक्ट किंवा ऑडिशनचा प्रस्ताव देत असतात. परंतु तेथे काम मिळणे व्हिसा आणि इतर साधनांच्या उपलब्धतेवर निर्भर असते. अखेर तो वेगळा देश असतो आणि संधीवेळी तेथे हजर असावे लागते. भारतात बसून तेथील चांगल्या भूमिका मिळविता येत नाहीत. ऑनलाइन ऑडिशन देता येते, परंतु तेथे जात काम करणे सर्वात चांगले असल्याचे दिशाने सांगितले आहे. दिशा अलिकडेच अक्षय कुमारसोबत 'वेलकम टू जंगल' चित्रपटात दिसून आली आहे. तर आगामी काळात ती 'आवारापन २'मध्ये दिसून येणार असून यात तिच्यासोबत इमरान हाश्मी असणार आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.